*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

# UNIT 3

# PURVAMIMAMSA AND CARVAK PHILOSPHY

# पूर्वमीमांसा आणि चार्वाक


----------------

## पूर्वमीमांसा दर्शन



भारतीय षड्दर्शनातील (वैदिक दर्शनातील) कट्टर वैदिक दर्शन म्हणजे 'पूर्वमीमांसा दर्शन' होय. पूर्वमीमांसा दर्शनासच 'मीमांसा दर्शन' अथवा 'मीमांसा' असेही नाव आहे. पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा ही जोडगोळी आहे. उत्तरमीमांसा म्हणजे वेदान्तदर्शन होय.(पूर्व आणि उत्तर ही दिशांची नावे नाहीत.) येथे पूर्व म्हणजे आधीचे आणि उत्तर म्हणजे नंतरचे (दर्शन) होय.

साधारणपणे मीमांसा म्हणजे चिकित्सा,परीक्षण,समीक्षण,सखोल जिज्ञासा इत्यादी असे अर्थ मानले जातात.पण 'पूर्वमीमांसा दर्शन' असा शब्दप्रयोग केला जातो तेंव्हा त्यातील मीमांसा = अर्थविवरण असे समीकरण मानले जाते.अर्थविवरण कशाचे ? तर वेदांचा अर्थ लावणे होय.वेदांच्या पूर्वभागाची मीमांसा ती पूर्वमीमांसा तर उत्तरभागाची मीमांसा ती उत्तरमीमांसा होय. वेदांच्या पूर्वभागात विशेषत: ब्राह्मणग्रंथ आहेत आणि उत्तरभागात उपनिषदे आहेत. वेद फार प्राचीन काळात रचले गेले.जसाजसा काळ गेला तसा त्यांचा अर्थ लावणे कठीण गेले. तो नेमका अर्थ काय असावा ? अशी समस्या निर्माण झाली.ती सोडविण्याच्या प्रयत्नातून पूर्वमीमांसेचा उगम झाला.



### मीमांसादर्शनाचे उद्दिष्ट


'मीमांसेत' कुठल्या वाङमयाचे चिंतन आहे ? तर वेदात मंत्र व ब्राह्मणग्रंथ असले तरी मंत्रापेक्षा ब्राह्मणग्रंथातील कर्मकांडावरच मीमांसादर्शनाने भर दिला आहे. त्यांचा अर्थ लावण्याचे कार्य हे दर्शन करते,त्यामुळे या दर्शनास 'कर्मकांडमीमांसा' म्हंटले तरी चालू शकते. ब्राह्मणग्रंथात यज्ञासंबंधातील अनेक परस्परभिन्न व विधीसंबंधी संशय निर्माण करणारी विधाने येतात,त्यांमध्ये एकसूत्रता आणणे व त्यांचा अर्थ निश्चित करणे हे मीमांसादर्शनाचे उद्दिष्ट आहे.पूर्वीच्या सर्व कर्मकांडात सुसूत्रता आणणे व अर्थ सांगणे ही

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

कामे मूलभूत होती.त्यामुळे या मीमांसेला 'दर्शन' हा दर्जा लाभला.विधीवाक्यातील नेमका अर्थ कसा घ्यावा हे सांगितल्यामुळे या दर्शनास 'शास्त्र' हा दर्जाही मिळला.' [1]

कर्मकांड करणे म्हणजे वेदांनी आदेश दिल्याप्रमाणे कर्तव्य करणे असे असल्याने मीमांसादर्शनात कर्तव्याला महत्व आहे.कर्तव्य या संज्ञेलाच 'धर्म' अशी संज्ञा दिली गेल्याने धर्म हा शब्द नंतर कर्तव्य याच अर्थाने वापरला गेला.उत्तरमीमांसेत म्हणजे वेदांतात ब्रह्मज्ञान महत्वाचे मानले गेल्याने त्याचे पहिले सूत्र " अथातो ब्रह्मजिज्ञासा" असे आहे तर पूर्वमीमांसेचे पहिले सूत्र "अथातो धर्मजिज्ञासा" असे आहे.

पूर्वमीमांसा दर्शनाचा ग्रंथ म्हणजे *मीमांसासूत्रे* होय.ती जैमिनी ऋषीने रचली.जैमिनीचा काल सांगता येत नाही.पण अंदाजे इ.स.पू.400 ते 200 (किंवा इ.स.पू.600 ते 200)हा असावा.अर्थात पतंजलीची योगसूत्रे




जशी महाभारतकालापासून अस्तित्वात असावीत,तसे मीमांसासूत्रेही प्राचीन समजली जातात.ती त्याकालात विखुरलेली होती.जैमिनीने ती एकत्र आणून तिची सुव्यवस्थित रचना केली.सूत्रसंख्या सुमारे 2745 असून ती बारा अध्यायात रचली गेली आहेत.बारा अध्यायांमुळे या सूत्रांना ' द्वादशलक्षणी '[2] असेही नाव आहे.

## पूर्वमीमांसेची सामाजिक भूमिका

मीमांसेचा उगम बुध्दक्रांतीनंतरचा आहे.गौतम बुध्दाने त्याकाळी मोठे सामाजिक परिवर्तन घडविले. लोक बौध्दधर्माकडे वळू लागले. वैदिकांची यज्ञसंस्था बदनाम व नामशेष होवू लागली.समाजरचनाही खिळखिळी होवू लागली.बौध्दांच्या संन्यासधर्मामुळे समाजाचे पोषण कमकुवत झाले.व्यवसाय, कुटुंबर रचना, कर्तव्ये यांना बाधा आली.त्यामुळे ती घडी नीट बसविणे, वैदिकधर्माची स्थापना करणे आवश्यक होती.वैदिक वाङमयाबद्दल लोकांमध्ये आदर व श्रध्दाभाव होताच. तो जागा करणे गरजेचे होते.ते करण्यासाठी मीमांसक पुढे सरसावले.त्यांनी कर्मकांडे, यज्ञयाग यांबद्दल सत्यता प्रस्थापि करण्यासाठी मीमांसादर्शन रचले.

Department Of Philosophy, Sangamner

[1] *पूर्वमीमांसा - हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञान : स. अं. डांगे,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी श्री लेखन वाचन भांडार, पुणे 30 1973 पान 460-62*

[2] *पूर्वमीमांसा - हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञान : स. अं. डांगे,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी श्री लेखन वाचन भांडार, पुणे 30 1973 पान 461*

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

वेदांमधील देवदेवतांना त्यांनी जणू मूर्त स्वरूप दिले. त्यांची प्रार्थना, पूजा, यज्ञ सुरु केले.ही भौतिक बाब होती.वेदांमधील यज्ञयागाचे फळ मिळाले नाहीतर ते का करावे ? असा प्रश्न बौध्दांनी विचारून शंका निर्माण केली होती.त्यामुळे मरणानंतर स्वर्ग,परलोक, पापपुण्य या गोष्टीना तर्कशास्त्रीय आधार देणे गरजेचे होते.ती  म मीमांसाकांनी केले.

प्रभाकर या मीमांसकाने म्हणून 'अपूर्व' ही संकल्पना प्रसारित केली.कोणत्याही विधीची फलप्राप्ती लगेच झाली नाही तरी त्याविधीपासून काहीतरी अज्ञेय फल निर्माण होते व नंतर का होईना मिळतेच. ते फल यज्ञकर्त्याला उपकारक असते, अशी ही कल्पना आहे.ते अदृश्य असते,म्हणूनच त्यास *'अदृष्ट'* म्हंटले आहे.अर्थातच ते सिध्द करता येत नाही. पण ते सत्य आहे, अशी मीमांसकांची **श्रध्दा** आहे.



## पूर्वमीमांसेची तात्त्विक भूमिका

मीमांसकाच्या मते वेद हेच सर्व ज्ञानाचा सागर आहे.वेदात जे आहे त्यापेक्षा जगात वेगळे ज्ञान असू शकत नाही.वेद सत्य आहेत, याचा अर्थ वेदात जे काही लिहिले आहे ते सर्व,प्रत्येक वेदवाक्य अचूक,सत्य व नित्य आहे.ते कधीही असत्य असू शकत नाही.म्हणून वेदांमध्ये जे सांगितले आहे त्यानुसारच आचरण करावे,त्यात शंका काढू नये.वेदवाक्ये स्वयंभू,स्वयंसिध्द, केवळ सत्य असेच आहेत.

वेद प्रमाण आहेत, हे पूर्वमीमांसेचे लक्ष्य होते.पण केवळ तसे ' मानावयाचे ' नाही तर त्याला तर्कशास्त्रीय आधार दिला पाहिजे, या भूमिकेतून त्यांनी दर्शनाची रचना केली.त्यांच्या मते 'वेदांचे ज्ञान हे माणसाचे जीवनध्येयच आहे, असे नव्हे तर सत्य जाणण्याचे ते साधन आहे.वेदाचे साधनमूल्य वेद प्रमाण असण्यात आहे.'

पूर्वमीमांसा दर्शनाच्या मते, -

1. ***वैदिक (हिंदुचे ) अधिकृत व अतिशय अचूक तत्त्वज्ञान वेदात सामावलेले आहे .***
2. ***वेद  नित्य आहेत.***
3. ***वेद अपौरुषेय आहेत.***
4. ***वेद सर्वश्रेष्ठ आहेत.***

पूर्वमीमांसेचे तत्त्वज्ञान मुख्यत: कर्मकाण्डात्मक आहे.माणसाने धर्म-अधर्म यात फरक करुन आपआपल्या वर्णजाती व स्त्रीपुरुष भेदाप्रमाणे कर्म करावे,असे वेद सांगतात.कोणते कर्म कोणत्या यज्ञविधीशी जोडले आहे,याचे वर्णन वेदात आहे.यज्ञ करण्याचा अधिकार केवळ ब्राह्मण,क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णानांच असून शूद्रांना मनाई आहे.शिवाय त्यातही स्त्रीचे स्थान महत्वाचे नाही, ते गौण, दुय्यम आहे.

## वेदांच्या अर्थविवरणाबाबतचे सिध्दान्त

### 1) 'अपौरुषेयत्व'

*'अपौरुषेय'* याचा अर्थ वेद कोणत्याही पुरुषाने म्हणजे मानवाने लिहीलेले नाहीत.तसेच ते ईश्वरानेही लिहीलेले नाहीत.वेद केवळ नित्य आहेत, याचा अर्थ वेद  निर्माणही झालेले नाहीत आणि ते नष्टही होत नसतात. ते विश्वनिर्मितीच्याही पूर्वी होते.वेद *केवल* आहेत.ते नाहीत, असे असू शकत नाहीत.वेदांच्या नंतर ईश्वर निर्माण झाला. म्हणूनच त्याची सर्वश्रेष्ठता इतकी महान आहे की ईश्वरापेक्षाही वेद श्रेष्ठ आहेत.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

*'अपौरुषेय'* म्हणजे ते स्वयंसिध्द आहेत. ते ऋषीना दिसले आहेत, ऋषीना वेदांनी स्वत:हून दर्शन दिले आहे.वेदात येणारी विविध ऋषींची नावे म्हणजे ज्यांना दर्शन मिळाले ते द्रष्टे ऋषी होत, अशी मीमांसकांची भूमिका आहे.

## 2) विधी - अर्थवाद :

वेदवाक्यांमध्ये विविध प्रकारची कर्मे, यज्ञ, याग सांगितले आहेत.ती वाक्ये सकृतदर्शनी वर्णनाची वाटतात. पण ती केवळ वर्णनाची नसून त्यामागे आदेश असतो, तो शोधून तसा यज्ञ करावा किंवा कृती करावी, अशी अपेक्षा असते. अशा वाक्यांना अर्थवाद म्हणतात.उदा. 'यजति' याचा अर्थ तो यज्ञ करतो असा वाटला तरी मूळ अर्थ 'तू यज्ञ कर' असा लावला पाहिजे.एखादा विधी करणे अथवा कृतीची निंदा करणे व त्या द्वारे विधी करण्यास प्रवृत्त करणे हा हेतू अर्थवादामागे असतो.

एका ठिकाणी 'अग्नी रडला' असे वाक्य आहे.तसे पाहाता हे निरर्थक वाक्य आहे.पण त्याला गूढ अर्थ आहे.अग्नीच्या अश्रूतून म्हणजे तो पेटून चांदी निर्माण झाली, असे अन्यत्र म्हंटले आहे.त्या दोन्हीचा अर्थ यज्ञात चांदी दक्षिणा म्हणून द्यावी, असा आहे !

## स्वत:प्रामाण्यवाद

वरील सर्व समज सत्य आणि फक्त सत्यच असल्याची पूर्वमीमांसा दर्शनाची श्रध्दा आहे.पण या श्रध्देच्या सत्यतेला पुरावा देण्यासाठी त्यांना नवे ज्ञानशास्त्र रचावे लागले. हे सिध्द करण्यासाठी पूर्वमीमांसकांनी 'ज्ञान स्वत:हून सत्य, प्रमाण असते' हा सिध्दान्त मांडाला.यास *'स्वत:प्रामाण्यवाद'* म्हणतात. त्यांच्या मते एखादे ज्ञान पूर्वी प्राप्त झालेले नसेल आणि अन्य प्रमाणांनी ( ज्ञानाच्या साधनांनी ) त्याचा बाध होत नसेल तर खरे मानावे. वेदातील कर्मकांडासंबंधीचे, स्वर्गाबदद्लचे ज्ञान अशा वरील स्वरूपाचे आहे.त्याचा प्रत्यक्षाने पडताळा घेता येत नाही.तरीही ते खोटे सुध्दा ठरविता येत नाही. त्यामुळे ते ज्ञान नेहमी प्रमाण असते.'प्रामाण्यं स्वत: उत्पद्यते' म्हणजे प्रमा = ज्ञान स्वत:हून सिध्द असते.सत्यता हा ज्ञानाचा गुण बाहेरून कोठून येवून ज्ञानास चिकटतो असे नव्हे तर तो त्याचा अंगभूत गुणधर्म आहे.

पूर्वमीमांसकांच्या मते कोणतेही नवे ज्ञान सुरुवातीला प्रमाणच मानायचे. अन्य प्रमाणांनी ते खोटे ठरविल्यास मग त्यानंतर ते भ्रमरूप मानता येईल. उदा. भूगोलावरील पुस्तक आपण वाचत असू तर लेखकावर विश्वास ठेवल्याने दिलेल्या माहितीचे प्राप्त होणारे ज्ञान केवळ सत्यच मानता पाहिजे. आपण मग शंका काढत नाही.शंका काढली तर ज्ञान होवूच शकत नाही.कारण विश्वास उरलेला नसतो.अगदी त्याप्रमाणे वेदांचे वाचन करताना एकाचवेळी आपणास ज्ञानही होते आणि विश्वासही बसतो.इतर सर्व ज्ञानांप्रमाणे वेदांचे ज्ञानदेखील सत्यच आहे.जर कुणी शंका काढली तर त्याने मीमांसादर्शनाचा अभ्यास करावा.वेद स्वत:च आपले ज्ञान आविष्कृत करतील. अशा रितीने वेद स्वयंप्रमाण आहेत.असा दावा मीमांसक करतात.हे सिध्द करण्यासाठी पुढील ज्ञानसाधने त्यांनी स्वीकारली.

## सहा प्रमाणे (ज्ञानसाधने)

(1) प्रत्यक्ष (2 ) अनुमान (3) शब्द (4) उपमान ही चार साधने न्यायदर्शनाने मान्य केली आहेत.तीच पूर्वमीमांसक स्वीकारतात.पण त्यात आणखी दोन साधनांची भरही घालतात. ती म्हणजे (5) अर्थापत्ती व (6) अनुपलब्धी .यापैकी चारांची माहिती आपण न्यायदर्शनात घेवू. आता येथे पाच व सहाची माहिती घेवू.



Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

## 5.अर्थापत्ती

अर्थापत्ती म्हणजे शब्दाच्या अर्थात सुचविला गेलेला परंतु थेटपणे न दिसणारा अर्थ. उदाहरणार्थ,समजा,

1.एखादा लठठ माणुस उपोषणाला बसला आहे पण.. ..
2. उपोषणाने त्याचा लठठपणा कमी होत नाही.

हा विरोध दिसतो.त्यामुळे असे समजावे लागते की.. ..

3.तो रात्री जेवत असणार.



हे तिसरे ज्ञान अर्थापत्तीने मिळते. ते उपलब्ध ज्ञानातच लपलेले असते.ते उघडकीस आणावे लागते.ते स्वयंसिध्दच असते.ते जाणावे व इतरांनाही जाणवून द्यावे, म्हणून ते खुले करावे लागते. *आधार विधाने माहित असताना निष्कर्ष विधाने शोधण्याची रीत म्हणजे अर्थापत्ती होय.*

## 6.अनुपलब्धी

उपलब्धी म्हणजे वस्तुचे ज्ञान प्रत्यक्षाने कळणे तर अनुपलब्धी म्हणजे ती वस्तु नाही,हे सुध्दा ज्ञानाच्या अभावानेच (प्रत्यक्ष) कळणे. एखादया ठिकाणी एखादी वस्तु आहे, याचे ज्ञान आपणांस प्रत्यक्ष इ. प्रमाणांनी होते.परंतु त्या ठिकाणी ती वस्तु नाही, हे ज्ञान कसे मिळते ? तर ते प्रमाण म्हणजे अनुउपलब्धी होय. अनुउपलब्धी म्हणजे उपलब्ध न होणे. उदा.खिशात पैसे आहेत,हे प्रत्यक्ष ज्ञान होते.पण पैसे नाहीत, हे कसे कळते ? आपण चाचपून पाहातो, पैसे आढळत नाहीत ! या पैसे न आढळण्यावरून 'पैशाचा अभाव' कळतो.

## ख्यातिवाद

आपणास जसे ज्ञान होत असते तसा भ्रमही होत असतो. ज्ञान मिळाले अशी भावना होते पण वास्तवात ते झालेले नाही असेही घडत असते. त्यास आपण *भास* किंवा *भ्रम* म्हणतात.ज्ञान प्रक्रियेत जसा ज्ञान होणे या घटनेचा विचार केला जातो तसा भ्रमाचाही विचार करणे आवश्यक असते.कारण भ्रम म्हणजे ज्ञानाचाच अभ्यास असतो. ज्ञानासारखे दिसणारे पण फसवणारे असे ते काहीतरी असते. म्हणून आपणांस जेव्हा ज्ञान होते. तेव्हा खरोखरच ज्ञान होते आहे की,ज्ञानाचा भास होत आहे. हे समजावून होणे आवश्यक आहे. भ्रमाविषयी प्रत्येक दर्शनाने विविध प्रकारची मते व्यक्त केलेली आहे. त्या सर्व सिध्दातांना तत्वज्ञानात *ख्यातीवाद* असे म्हटले आहे.

व्युत्पत्ती

ख्याति हा शब्द 'ख्या' या हेतुला 'क्तिन' हा प्रत्यय लावून तयार झालेला आहे, ख्या म्हणजे कळविणे सांगणे, प्रसिध्द करणे होय. म्हणून ख्याति म्हणजे प्रसिध्द होणे.'ख्याति' म्हणजे ज्ञान किंवा जाणीव असा अर्थ आहे. हा *ख्याति* शब्दाचा सर्वसामान्य अर्थ झाला. पण तत्वज्ञानात मात्र ख्याति हा शब्द संदिग्ध आहे.

ज्ञान आणि भ्रम या दोन्ही अर्थाने ख्याति ही संज्ञा तत्त्वज्ञानात वापरली जाते. ख्याति होणे म्हणजे प्रसिध्द होणे. पण ही प्रसिध्दी विविध व्यक्तींना एकसारखीच होते असे नाही ती वेगवेगळी होते.म्हणजेच ती अनेकांनी वेगवेगळी भासते. त्यामुळेचं ते जे काही कळते ते ज्ञान आहे का भास ? असा संशय निर्माण होतो म्हणूनच ख्याति हा शब्द 1) ज्ञान आणि 2) भास किंवा भ्रम या दोन्ही अर्थाने वापरला जातो.शब्दार्थ संशयास्पद आहे, हे ख्याति म्हणजे भास या अर्थाने वापरले जाण्याचे पाहिले कारण होय.

Department of Philosophy, Sangamner college, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

दुसरे कारण म्हणजे भारतीय तत्वज्ञानात ख्याती स्वातंत्र्य संकल्पना असली तरी मुळात तो एक सामाजिक शब्द आहे. म्हणजेच ख्या या धातुला क्तिन प्रत्यय लावून तो प्रसिध्द होणे,या अर्थाने वापरला जात असल्याने प्रसिध्दी संशयास्पद बनते.

वरील दोन कारणांमुळे ख्यातिचा मूळ अर्थ ज्ञान किंवा जाणीव असा असला तरी तो भ्रम किंवा भास याच मुख्यत अर्थाने वापरला गेला.याच अर्थाने ख्याति हा शब्द इंग्लीशमधील Error , illusion या शब्दांशी समानार्थी आहे. म्हणून ख्यातिवादास इंग्लीश मध्ये Theories of Err असे म्हटले आहे.

6

भारतीय तत्वज्ञानात पाच प्रकारच्या ख्याति आहेत म्हणजेच ज्ञान जसे विविध ज्ञान मार्गाने होते, तसे ज्ञानाचा भास सुध्दा विविध पध्दतीने होते, असे मानलेले आहे. तसा ज्ञानाभास सुध्दा विविध पध्दतीने होतो. चार्वाक दर्शन वगळता सर्व दर्शनांनी भ्रमाबद्दल वेगवेगळी मते मांडली त्या सर्वाना मिळून ***ख्यातिवाद*** असे म्हटले आहे.मीमांसकांनी दोन ख्याति मानल्या. 1) विपरीत ख्याति व 2) अख्याति.

**विपरीत ख्याति :**

ही ख्याति कुमारील या मीमांसकाने मांडली.स्फटिकाशेजारी फूल ठेवले तर तो स्फटिक शुभ्र दिसण्याऐवजी लाल दिसतो.हा आभास. येथे काय घडते ? तर कुमारिलाच्या मते लाल खरा आहे आणि शुभ्रताही खरी आहे.त्यांच्यात संबंध नसतो, पण आपण तसा आरोप करतो, समजतो.स्फटीक या आधारावर लाल हे आधेय आरोपित केले जाते. हा आधार-आधेय संबंध प्रस्थापित होवून भास होतो.वास्तविक असलेल्या संबंधाहून विपरीत संबंधाचे ग्रहाण परिस्थितीजन्य कारणामुळे होते. म्हणून यास विपारीत ख्याति म्हणावे.

**अख्याति.**

ही ख्याति प्रभाकर या मीमांसकाने मांडली.त्यांच्या मते भ्रम हीच गोष्ट भ्रामक आहे. जे ज्ञान होते ते सत्यच होते.उदाहरणार्थ समुद्रकिनारी वाळूत चांदी दिसते.वस्तुत: ते शिंपले असते पण वाटते चांदी ! तर पूर्वी कधीतरी पाहिलेल्या चांदीचे स्मरण होते.त्याचा आरोप शिंपल्यावर होतो.म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान व स्मरण या दोन घटकांनी मिळून तो भास निर्माण होतो.

प्रभाकराच्या मते दोन्ही ज्ञान सत्यच असतात. फक्त वेगवेगळ्या ठिकाणी असतात.एकाचे प्रत्यक्ष होते तर दुसऱ्याचे स्मरण होते व त्यांची मिसळण होते.ज्ञान म्हणून दोन्ही सत्यच असतात.म्हणजेच कोणतेही ज्ञान सत्यच असते.ते कधीही असत्य असत नाही.त्यांचा परस्परांवर आरोप होतो एवढेच ! वेगळ्या पध्दतीने ज्ञान होते.

## चार्वाक दर्शन

चार्वाक ही संज्ञा 'चारु + वाक् ' या शब्दापासून तयार होते. चारु वाक् म्हणजे गोड बोलणे.त्यामुळे गोड बोलून काम करावे अथवा करुन घ्यावे असे सांगणारे तत्वज्ञान असा त्याचा अर्थ होतो.अर्थातच हा अंदाज आहे, मूलार्थ नाही.

### लोकायत परंपरा

चार्वाक नावाचा विचारवंत प्राचीन काळात होवून गेला असावा, असे महाभारततील उल्लेखावरून वाटते.हा एक विद्वान,पक्व बुध्दिचा ब्राह्मण होता. चार्वाकाने मांडलेले विचार लोकांना मान्य झाले.त्यामुळे त्याच्या तत्त्वज्ञानास '***लोकायत***' असेही नाव आहे.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

लोक याचे दोन अर्थ होतात : **लोकजन आणि ज्ञानाची पंचइंद्रीये**.इंद्रीयांनी जगाचा अनुभव घेतला जातो. म्हणून लोक म्हणजे इहलोक होय.आयत म्हणजे आधार. त्यामुळे लोकायत म्हणजे इहलोकावर आधारलेले चिंतन. *लोकेषु आयतम्* = लोकांमध्ये प्रिय असणारे, असे मध्वाचार्य म्हणतात तर लोक नावाच्या ऋषीचा पुत्र असे लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात.लोकायत दर्शनाची थोडक्यात पण पध्दतशीर मांडणी हरिभद्रसूरी या जैन आचार्याच्या *'षडदर्शनसमुच्चय'* या ग्रंथात आढळते.[3]



चार्वाक व्यक्तिनाम असले तरी या मताचा स्वीकार करणारे अनेक जण असल्याने लोकायम मताची परंपरा निर्माण झाली. ती सतत पुढे येत राहिली.काहीजणांच्या मते बृहस्पती नामक देवगुरुने ही विचारसरणी मांडली.त्यामुळे या तत्त्वज्ञानास *'बृहस्पती दर्शन'* अथवा *बार्हस्पत्यदर्शन* असेही नाव आहे. बृहस्पती देवगुरुने हे तत्त्वज्ञान सूत्ररूपात म्हणजे श्लोकरूपात मांडले.त्यांना *'बार्हस्पत्यसूत्रे'* असे नाव आहे.इ.स.आठव्या शतका पासून चार्वाक हे नाव मान्य झाले. त्याआधी लोकायत असे नाव होते.

चार्वाक दर्शन ही अतिशय महत्वाची विचारसरणी असून ती वैज्ञानिक दृष्टीचा पुरस्कार करते.आज आपण ज्यास विज्ञान म्हणतो ती ज्ञान मिळविण्याची एक पध्दती आहे.त्या पध्दतीलाचा वैज्ञानिक पध्दती म्हंटले जाते.ज्याचा अनुभव येतो किंवा येवू शकतो तीच बाब सत्य आहे, इतर नाही, असे विज्ञान सांगते.शिवाय अनुभव नेहमी खुला असतो.हीच विचारसरणी प्राचीन काळी विज्ञान उपलब्ध नसतानाही चार्वाकांनी मांडली ही त्यांची दूरदृष्टी होय.

### प्रमाणसिध्दान्त

इतर दर्शनांप्रमाणे चार्वाकांनीही आपला ज्ञानसिध्दान्त मांडला.मानवी ज्ञान कसे होते ? ज्ञानाची व्याख्य कशी करावी ? इत्यादी समस्यांची त्यांनी उत्तरे दिली.ते फक्त अनुभव किंवा प्रत्यक्ष हेच प्रमाण मानतात.

### प्रत्यक्ष

चार्वाकांच्या मते प्रत्यक्ष अनुभव हेच केवळ ज्ञानाचे साधन आहे.ज्यांचा आपल्या ज्ञानेद्रियांना प्रत्यक्ष अनुभव येवू शकतो,तेच सत्य असून इतर गोष्टीवर विश्वास ठेवता येत नाही.अनुभवालाच ते *'प्रत्यक्ष '* असे म्हणतात. *प्रत्यक्षमेव प्रमाणम्*

## वेद आणि वैदिक कर्मकांडावरील टीका

वेद वैदिक कर्मकांडावर बौध्द, जैन व चार्वाकांनी टीका केली.वैदिक कर्मकांडावर वेदांचाच भाग असणाऱ्या उपनिषदांनीही टीका केली.पण यातील चार्वाकांची टीका अतिशय टोकाची आहे.चार्वाक हे कट्टर नास्तिक दर्शन आहे.

प्रत्यक्ष हेच ज्ञानाचे साधन असल्याने ज्याचे प्रत्यक्ष (ज्ञान) होवू शकत नाही ते अस्तित्वात नाही,असे चार्वाक समजतात.त्यानुसार चार्वाक तत्त्वज्ञ अंतिम सत्य,आत्मा,ईश्वर,ब्रह्म अशा तत्त्वांवर विश्वास ठेवित नाहीत.श्राध्द, पितृपक्ष,पुनर्जन्म इत्यादी गोष्टीचा अनुभव येत नाही.त्यामुळे त्या धादांत खोट्या आहेत.ती धार्मिक फसवणूक आहे, असे त्यांचे मत आहे.ते म्हणतात,

*अग्निहोत्र त्रयो वेदास्त्रदण्डं भस्मगुण्ठनम्*
*बुध्दिपौरुषहीनानां जीविकेति बृहस्पति:*

[3] सर्वदर्शनसंग्रह भाषांतर र.प. कंगले पान 12 उपोद्घात



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



''अग्निहोत्राचा ठाण मांडून, वेदपठणाचे अवडंबर माजवून, भस्म लावून पौरोहित्य इत्यादी मार्गानी उपजीविका करणे, हे बुध्दि आणि पौरुष नसलेल्या व्यक्तींचा आडमार्ग आहे. त्रयो वेदस्य कर्तार: भण्डधूर्त निशाचरा: '' वेदांची रचना धूर्त, कारस्थांनी पुरोहितांनी केवळ शोषणासाठी केली आहे,'' असा आरोप चार्वाक करतात.वेद हे धूर्ताचे प्रलाप असून यज्ञयाग हाच त्यांच्या उत्पनांचा मार्ग आहे.ही फसवणूक आहे.ते म्हणतात,

***मृतानां प्रेतकार्याणि न त्वन्यादि्वदयते क्वचित***
***त्रयो वेदस्य कर्ता भण्डधूर्तनिशाचरा:***
***जर्भरीतुर्फरीत्यादि पण्डितानां वच: स्मृतम् ...***
***मासांनां खादनं तव्दन्निशाचरसमीरितम्***

यज्ञात पशुबळी देण्याच्या प्रथेविरूध्द ते कडक टीका करतात. निष्पाप जीवांची हत्या करण्याचा काहीही अधिकार वैदिकांना नाही.मांस खाण्यात अतिशय राक्षसी क्रौर्य असते , हे चार्वाक लक्षात आणून देतात. यज्ञात बळी देवून तो स्वर्गातील पितरांकडे जात असेल तर वैदिक आपल्या बापालाच का बळी देत नाही ? म्हणजे तो थेट स्वर्गातच जाईल ! असे ते म्हणतात.

## भूतचैतन्यवाद

प्रत्यक्षाने आपणास कशाचा अनुभव येतो ? चार्वाकांचा मते प्रत्यक्षाने आपणास केवळ भौतिक जगाचाच अनुभव येतो.जगाचे चार घटक आहेत. 1) पृथ्वी 2) अग्नी 3) वायू आणि 4) जल.यांना *महाभूते* म्हणतात.केवळ हीच चार महाभूते अस्तित्वात असतात.ही महाभूते भौतिक आहेत, याचा अर्थ आपणास त्यांचा अनुभव येतो. ती अनुभवापलिकडे नाहीत. म्हणूनच चार्वाक त्यांना मान्यता देतात. त्यामुळे चार्वाकांना *भौतिकवादी तत्त्वज्ञ* म्हंटले जाते.आकाश नावाचे पाचवे महाभूत इतर वैदिक दर्शने स्वीकारतात.मात्र चार्वाकांच्या मते आकाशाचा अनुभव येत नाही,त्यामुळे आकाश अस्तित्वात नाही.

मग जड शरीरात जी चेतना दिसते, भौतिक पृथ्वीवर अग्नी, वायू, जल इत्यादी चेतनमय गोष्टी आढळतात, त्य कुठून आल्या ? यावर चार्वाकांचे उत्तर असे की, जडद्रव्यांचा संयोग होवून चेतना निर्माण होते.चैतन्य जडाहून भिन्न आहे , पण तो जडाचाच विकार आहे.पान,चुना, कात यात काही लाल रंग नसतो.पण एकत्र करुन खाल्ल्यानंतर मात्र लालरंग तयार होतो.गूळ,पीठ,खसखस इत्यादी गोष्टीत नशा नसते पण त्यांची भांग वाटली की नशा निर्माण होते; तसे चार महाभूते एकत्र आली की जाणीव, चेतना निर्माण होते.जडातूनच चेतना निर्माण येते.''भूतेभ्य: चैतन्यम् '' हा चार्वाकांचा स्वभाववाद किंवा भूतचैतन्यवाद होय.

## देहात्मवाद

''मी उंच आहे'' , ''मी हुशार आहे '' इत्यादी विधानांमधील 'मी ' म्हणजे शरीर असते, आत्मा नाही. आपल्याला जो प्रत्यक्ष अनुभव येतो तो शरीराचा.त्यामुळे मी म्हणजे शरीर होय.आत्मा मानावयाचाच असला तर देहालाच आत्मा मानावे.''देह हाच आत्मा '' असे चार्वाक म्हणतात.



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

देह चार महाभूतांपासूनच बनतो.ते एकत्र आले की शरीरात चेतना निर्माण होते.जसे कात,चुना,तंबाखू पानात घालून खाल्ल्यानंतर मुळात अस्तित्वात नसलेला लाल रंग तयार होतो,तसे चार महाभूते एकत्र आली की शरीरात चैतन्य निर्माण होते. हाच *चैतन्यविशिष्ट देह* होय. *''तच्चैतन्यविशिष्ट देह एवात्मा देहातिरिक्त आत्मनि प्रमाणाभावात् ''***चैतन्यविशिष्ट देह म्हणजेच आत्मा**. देहाव्यतिरिक्त आत्मा असतो, याला पुरावा नाही !

या चैतन्यालाच काही लोक चुकून 'आत्मा' म्हणतात,तथापि आपणास आत्म्याचा कोणताही अनुभव येत नाही. त्यामुळे आत्मा नावाचे द्रव्य नसते.माणूस मरतो याचा अर्थ ही चार महाभूते वेगवेगळी होतात, एवढेच. म्हणूनच पुर्नजन्म नसतो. एकदा देहाची राख झाली की पुन्हा जन्म मिळत नसतो.या सिध्दान्तास ***देहात्मवाद*** म्हणतात.



आत्म्याप्रमाणेच ईश्वरचाही आपणांस कधीही अनुभव येत नाही.हे जग चार महाभूते एकत्र येवून निर्माण झालेले आहे.ते कुणी निर्माण केलेले नाही,त्यास कोणीही निर्माता नाही. त्यामुळेच कोणतेही धार्मिक ग्रंथ स्वीकारणे चूक आणि दिशाभूल करणारे आहे.कसलेही कर्मकांड,पूर्जाअर्चा,जपजाप्य करणे हा मुर्खपणा आहे.

## नैतिक दृष्टिकोन

एकदा देहाची राख झाली की पुन्हा जन्म मिळत नसल्याने माणसाने हा मिळालेला जन्म केवळ सुख मिळविण्यातच घालवावा.माणसाचे सर्वोच्च ध्येय केवळ सुख हेच असले पाहिजे.मानवी जीवन सुखी करण्यासाठी मानवाने जीवनशिक्षण, शेती, व्यवसाय, उद्योग, साहित्य, संगीत, कला, नाट्य, चिंतन यांची निर्मिती करावी. त्यांचा उपभोग घ्यावा आणि सुखाने जगावे,असा सुखवाद चार्वाक मांडतात.

## अर्थ व काम

केवळ प्रत्यक्ष हेच प्रमाण मानल्यामुळे चार्वाकांनी चार पुरुषार्थांपैकी केवळ अर्थ व काम यांनाच मान्यता दिली.नीती केवळ अर्थ व काम यातच आहे.माणसाच्या आयुष्याचे ध्येय केवळ सुख हेच असते. सुखासाठीच माणसे जगत असतात. ते सुख कशात आहे ? तर सुख ही भौतिक घटन आहे.त्यामुळे सुखाचा शोधही भौतिक कृतीतच शोधला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे.हा त्यांचा *सुखवाद* होय.

*''अंगनाद्यालिंगनादिजन्य सुखमेव पुरुषार्थ: .. ''* : स्त्रियांचे अलिंगन इत्यादिपासून प्राप्त होणारे सुख हाच एकमेव पुरुषार्थ आहे.आणि सुख दु:खमिश्रित असल्याने ते बाजूला वेचून काढून केवळ सुख घ्यावे.सुख हे भौतिक असल्याने ज्यात आणि ज्यापासून सुख लाभते, त्याच कृती कराव्यात. उदाहरणार्थ ते म्हणतात,

***'' कृषिगोरक्ष्यवाणिज्यदण्डनीत्यादिभर्बुध:
दृष्ट्यैरेव सदुपायैभोगाननुवेद् भवि ''***

म्हणजे शहाण्या जाणत्या माणसाने शेती,गोपालन, व्यापारउदिम, शासकीय व्यवस्थेतील सहभाग या सारख्या दृश्य (भौतिक)मार्गांचा अवलंब करून सुखाने, समृध्दीने जीवन जगावे. चार्वाक दर्शन एका अर्थाने शेतीपूरक तत्त्वज्ञानच आहे. शेती,उद्योगधंदा हे समाजाचे धोरण असावे, असे तत्त्वज्ञान फक्त चार्वाकांनीच मांडले.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

चार्वाकांनी अशा प्रकारे त्यांचा भौतिकवाद (Materialism) मांडला.या भूमिकेतूनच ते वैदिकांचे - म्हणजे हिंदुधर्माचा आधार असलेले वेदग्रंथ,धर्मग्रंथ नाकारतात.म्हणून त्यांना नास्तिक / अवैदिक म्हंटले आहे.

जीवनोपयोगी तत्त्वज्ञान मांडणाऱ्या चार्वाकवादाची बदनामी करण्यात मात्र वैदिकांनी अतिरेक गाठला.या विचारसरणीचे शुध्दीकरण (खरे तर मूळ स्वरूप) निश्चित करण्याचे काम गेल्या शतकापासून चालू आहे. देबीप्रसाद चट्टोपाध्याय,डॉ.आ.ह.साळुंखे,उदय कुमठेकर, सदाशिव आठवले,रा.गो. कुलकर्णी, डॉ.सर्वानंद पाठक, प्रा.मा.य.भिडे ही काही ठळक नावे आहेत.



------------------------------------------------------

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner